**<u>संक्षिप्त फौजदारी खटला क्र.७६/२०१९</u>**

**<u>शासन वि. मुसा व ईतर</u>**

–:: **<u>नि.क्र.१ लगत आदेश</u>** ::–

मी प्रकरणाचे काळजीपूर्वक अवलोकन केले. सदर प्रकरणामध्ये आरोपीला पोलीस ठाणे अहमदपूर यांच्या मार्फत समन्स काढला होता. परंतु पोलीस ठाणे अधिकारी, पोलीस ठाणे देवणी यांनी सदर समन्स पोलीस ठाणे अहमदपूर यांना न पाठविता पोलीस शिपाई एस.व्ही. कुरे यांनी सदर समन्सचा अहवाल सादर केला आणि आरोपी हा शोध घेतला असता आरोपी मिळून आला नाही असा शेरा दिला. परंतु त्यासोबत आरोपी राहत असल्याचे ठिकाणी गेला किंवा कसे किंवा ठाणे दैनंदिनीची नोंद सादर केली नाही. सदर पोलीस शिपायाने चुकीचा रिपोर्ट दिला आणि त्याद्वारे न्यायालयीन आदेशाची अवज्ञा केली. त्यानुसार सदर पोलिसांनी भारतीय न्याय संहितेचे कलम १८८ प्रमाणे गुन्हा केल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. सबब ठाणे अधिकारी पोलीस ठाणे देवणी आणि पोलीस शिपाई श्री. एस.व्ही. कुरे बक्कल क्र.९९९ यांना कारणे दाखवा नोटीस काढणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस काढण्यात यावी.

०२. आदेश संगणकावर टंकलिखित केला आणि खुल्या न्यायालयात घोषित केला.

Digitally signed by SHARAD AWADHUTRAO SURJUSE
Date: 2025.12.17 17:57:50 +0530

**ठिकाण – देवणी** **( शरद अ. सुरजुसे )**

**दिनांक – १७–१२–२०२५** **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,**

**देवणी.**